# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २५/०५/२०२३

# प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

केंद्र शासनाच्या मिशन लाईफ ( Life Style for Environment ) तसेच महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातर्फे माझी वसुंधरा अभियान ४.० या उपक्रमाअंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभाग तसेच पर्यावरण दक्षता मंडळ, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५,मे २०२३ रोजी उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय तसेच महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका या दोन ठिकाणी पर्यावरणातील भुमी, जल, वायु, अग्नि व आकाश या पाच घटकांमध्ये होणारे प्रदुषण कमी करण्यासाठी नागरीकांनी कोणत्या चांगल्या सवयींचा आपल्या दैनंदिन जीवनामध्ये वापर केला पाहिजे. याबाबत मार्गदर्शनपर लघुपट प्रदर्शित करून त्याद्वारे उपस्थित महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच अभ्यासिकेतील विद्यार्थी यांच्यामध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उपस्थितांना पर्यावरणपुरक शपथ देखील देण्यात आली.

मा. आयुक्त अजीज शेख, मा. अति. आयुक्त, डॉ. करूणा जुईकर, मा. अति. आयुक्त, जमीर लेंगरेकर, व मा. उपायुक्त डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पर्यावरण दक्षता मंडळ, ठाणे या संस्थेच्या सचिव श्रीम. संगिता जोशी यांनी सिंगल युज प्लास्टीक बंदी, नदी, तलाव यांचे संवर्धन, कच-याचे वर्गीकरण, कच-यापासुन धरच्याघरी खत तयार करणे, जैवविविधता जपणे तसेच मिशन लाईफ याद्वारे नागरीकांना विजेची बचत, पाण्याची बचत, अन्नाची बचत, कच-याचे व्यवस्थापन (Reduce, Reuse, Recycle) करण्यासाठी कोणत्या चांगल्या सवयी आत्मसात केल्या पाहिजेत या विषयावरील लघुपट प्रदर्शित करून उपस्थितांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता आणण्याच्यादृष्टीने योग्य मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन पर्यावरण विभागाच्या विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत, लिपीक, श्री. सयाजी घाटविसावे, लिपीक श्री. भानु परमार यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी जनसंपर्क अधिकारी, श्रीम. छाया डांगळे, श्रीम. श्रध्दा बाविस्कर, श्री. अंकुश कदम, श्री. बाळासाहेब नेटके श्री. राजेश घनघाव, श्रीम. सुनिता वत्तुरकर इतर अधिकारी/कर्मचारी तसेच अभ्यासिकेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत —माहितीस्तव सादर.

मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

- सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.